# प्रेस नोट

दिनांक ०८/१०/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ४१/२०२१ |
| ३ | कलम | कलम ७, भ्र.प्र अधिनियम –१९८८ |
| ४ | आरोपीचे नाव कार्यालयाचा पत्ता | श्रीमती सुजाता आबासाहेब पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग, मुंबई. रा.ठी. 'ए' विंग, आदित्य को.ऑ.हौ. सोसायटी, रू.नं. १०१, वर्सोवा रोड, डी.एन. नगर, अंधेरी (प), मुंबई–५३ |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १,००,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ४०,०००/– |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रू. ४०,०००/– |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांच्या मालकीचा गाळा नं.०३, नादीर शहा तबेला, सुभाष नगर, जोगेश्वरी पुर्व मुंबई–६० येथील २२० स्क्वे.फुट क्षेत्रफळाचा गाळा त्यांनी भाडे तत्वावर दिला होता. सदर गाळा तक्रारदार यांनी दि. ०५/१०/२०२१ रोजी भाडेकरू यांचेकडून ताब्यात घेतला होता.<br>सदर गाळ्याचे कुलुप निता महाडीक व त्यांच्या साथिदाराने तोडल्याने दि. ०६/१०/२०२१ रोजी तक्रारदार हे जोगेश्वरी पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी गेले असता, पोलीस ठाणे येथे तक्रार नोंद करून घेतली नसल्यामुळे तक्रारदार हे संबधित विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती सुजाता पाटील यांना त्यांच्या कार्यालयात भेटण्यास गेले. तक्रारदार यांची तक्रार पोलीस ठाणेस नोंद करण्यास सांगण्यासाठी व जागेचा ताबा घेतलेल्या महिलेचा भविष्यात त्रास होऊ नये या कारणासाठी लोकसेवक श्रीमती सुजाता पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/– लाचेची मागणी केली. त्यापैकी रू. १०,०००/– त्याच दिवशी स्विकारले. लोकसेवकास उर्वरीत रक्कमेची लाच देण्याची तक्रारदार यांची इच्छा नसल्याने त्यांनी दि.०७/१०/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे समक्ष हजर राहुन तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०८/१०/२०२१ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान लोकसेवक श्रीमती सुजाता पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग, मुंबई यांनी तडजोडी अंती तक्रारदार यांचेकडून रू. ४०,०००/– रक्कमेची लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली त्यानुसार सापळा कारवाईच्या दरम्यान तक्रारदार यांचेकडून लोकसेवक श्रीमती सुजाता पाटील यांना रू. ४०,०००/– ची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले.<br>सदरबाबत लोकसेवक श्रीमती सुजाता पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग, मुंबई यांचे विरुध्द ला.प्र.वि. मुंबई येथे गु.र.क्र. ४१/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत आहे. |

Signature 8/10/2021

( वैशाली गोरडे )
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.


संपर्क– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ–acbmaharastra.gov.in
ईमेल– १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज–www.acbmaharastra.net.टोलफ्रि क्र. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स क्र: ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००